ePaper

| वर्ष - 7 | अंक - 168 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 26 ऑक्टोबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## संघर्ष यात्रेवरून प्रफुल्ल पटेलांचा रोहित पवारांना टोला!





**आतील पानांत**

- कांगारूंचा करेक्ट कार्यक्रम!
- तू काही माधुरी दीक्षित नाही
- हमास दहशतवादी संघटना नाही!
- कंत्राटी डॉक्टर-कर्मचाऱ्यांचे आंदोलन!

# एमआयडीसीतील कामगारांचा प्रवास सुखाचा!

## » 'पीएमपीएमएल'कडून 49 मार्गावरून बससेवा सुरु

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराच्या कानाकोपऱ्यातून भोसरी आणि चाकण येथील एमआयडीसीतील कंपन्यामध्ये कामासाठी जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. या कामगारांसह अन्य प्रवाशांना सुरक्षित आणि जलद सेवा देण्यासाठी पीएमपीकडून शहरातील ४९ मार्गावरून बससेवा उपलब्ध असून, प्रवाशांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पीएमपी प्रशसनाकडून करण्यात आले.**

भोसरी एम.आय.डी.सी.त जाण्यासाठी पुणे मनपा भवन, पुणे स्टेशन, हडपसर, कात्रज, वारजे माळवाडी, निगडी, चिंचवड गाव, पिंपरी, आळंदी व सांगवी या बसस्थानकांवरून दिवसभरात २४१ बसद्वारे ३९ मार्गावर २ हजार ६५४ फेऱ्यांच्या माध्यमातून सेवा दिली जाते. तर चाकण भोसरी उद्योग परिसरासाठी पीएमपीची सेवा एम.आय.डी.सी.साठी भोसरी, निगडी, पिंपळे गुरव, तळेगांव दाभाडे, राजगुरूनगर आणि आळंदी या बसस्थानकांवरून दिवसभरात ६७ बसद्वारे १० मार्गावर ७५६ फेऱ्या होतात. त्यामुळे प्रवाशांना शहराच्या कानाकोपऱ्यातून भोसरी आणि चाकण येथील एमआयडीसीत जाणे शक्य आहे.



### पुणे मनपा ते भोसरी मार्गावर प्रवाशांचा प्रतिसाद...

» दरम्यान, पुणे मनपा ते भोसरी या अंतरात विनावाहक बससेवाही सुरू केली असून, त्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे वेळेची बचत होऊन भोसरी येथून एमआयडीसीत जाणे सोपे झाले आहे. तसेच मासुळकर कॉलनीसाठीची पिंपरीगांव ते आळंदी, पुणे स्टेशन ते पिंपरीगांव, मनपा भवन ते पिंपरीगांव आणि निगडी ते नाशिक फाटा ही बससेवा उपलब्ध असल्याचे पीएमपी प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# पिंपरी-चिंचवडमधील मराठा बांधव आक्रमक!

## » साखळी उपोषण : मनोज जरांगे-पाटील यांना पाठिंबा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून मनोज जरांगे पाटील हे महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात सभा घेत आहेत. मराठा समाजाच्या आरक्षणाविषयी ४० दिवसांची मुदत संपली असून ते आजपासून उपोषण करणार आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये देखील जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाकडून साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे.**

या दरम्यानच्या काळात पिंपरी-चिंचवड शहरातील नेत्यांना आणि पुढाऱ्यांना सभा तसेच कार्यक्रम घेऊ दिला जाणार नाही, असा इशाराही सकल मराठा समाजाच्या बांधवांकडून देण्यात आला आहे. पिंपरीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात सकल मराठा बांधवांकडून साखळी उपोषण केले जात आहे.

यावेळी मानव कांबळे, सचिन चिखले, मारुती भापकर, प्रकाश जाधव, अजिज शेख, अँड.वंदना जाधव, अँड.लक्ष्मण रानवडे, काशिनाथ जगताप, सतिश चांदेरे, धनाजी येळकर, राजन नायर यांनी मनोगते व्यक्त केले. या दिवशी सतीश काळे, वैभव जाधव, लहू लांडगे, मिराताई कदम, नकुल भोईर, अभिषेक म्हसे, प्रतिभा भालेकर, ज्योती जाधव, उमेश जमदाडे, गणेश जाधव यांच्यासह अनेक बांधवांनी साखळी उपोषण सुरु केले आहे.




### नेत्यांना सभा, कार्यक्रम बंदी...

» मराठा बांधव म्हणाले, मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी अद्यापही पूर्ण केलेली नाही. गेली ४० वर्ष झाले मराठा समाजाची केंद्र आणि राज्य सरकार फसवणूक करत आहे. आजपासून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा उपोषण सुरू केलं आहे. सरकारने टिकणारे उपोषण देऊन मराठा समाजाच्या तरुणांच्या आत्महत्या थांबवाव्यात. जोपर्यंत जरांगे पाटील हे उपोषण करणार आहेत, तोपर्यंत आम्ही साखळी उपोषण करणार आहोत. दरम्यानच्या काळात शहरातील कुठल्याही नेत्यांना, पुढाऱ्यांना सभा, कार्यक्रम घेऊ देणार नाही, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

# 4 हजार 204 फेरीवाल्यांना मिळणार हक्काची जागा

## » शहरात महापालिका एकूण 53 फेरीवाला क्षेत्र तयार करणार

। । पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली कै. मधुकर पवळे सभागृह येथे पिंपरी चिंचवड मनपा शहर फेरीवाला समितीची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, सहाय्यक आयुक्त विजयकुमार सरनाईक व क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते. तसेच शहर फेरीवाला समितीचे सदस्य उपस्थित होते. बैठकीमध्ये शहरांमधील विविध भागांमध्ये (Pimpri) जे फेरीवाले व्यवसाय करत आहेत, त्यांच्यासाठी त्याच भागांमध्ये हॉकर्स झोन किंवा फेरीवाले क्षेत्र निर्माण करण्याचे ठरविले आहे.



ज्या भागात जास्त प्रमाणात रहदारीस अडथळा निर्माण होतो, अशा ठिकाणी प्राधान्याने हॉकर्स झोन निर्माण करून ते रस्ते व चौक मोकळे करणे हा प्रमुख उद्देश आहे.

शहरातील ज्या फेरीवाल्यांमुळे रहदारीस अडचणी निर्माण होतात, तसेच फुटपाथवरील फेरीवाल्यांवर वारंवार अतिक्रमण विभागामार्फत कारवाई होते, अशा फेरीवाल्यांना यामुळे दिलासा मिळणार आहे.

# जुन्नरमध्ये शरद पवारांची एन्ट्री!

## » सत्यशील शेरकर राष्ट्रवादीत प्रवेश करणार?

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप झाला. त्यानंतर शरद पवार आणि अजित पवार हे दोन गट पडले. अजित पवार यांच्यासोबत बहुसंख्य आमदार गेल्यानंतर ८३ वर्षीय शरद पवार पुन्हा मैदानात उतरले असून पक्ष बांधणीसाठी त्यांनी दौरे सुरू केले आहेत. काही दिवसांपूर्वी शरद पवार हे जुन्नर तालुक्याच्या दौऱ्यावर होते.**



त्या दौऱ्यात विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे सर्वेसर्वा सत्यशील शेरकर यांच्या घरचा पाहुणचार स्वीकारून पवारांनी त्यांच्याशी 'विशेष हितगुज' केलं. त्यानंतर सत्यशील शेरकर हे शरद पवार गटात जाणार असल्याच्या जोरदार चर्चा रंगल्या. त्यात जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांना सत्यशील शेरकर पर्याय होऊ शकतात, अशी शक्यता देखील वर्तवली जात होती. मात्र अतुल बेनके आणि सत्यशील शेरकर एकच असल्याचे सांगून त्यांनी चर्चेवर पडदा टाकला होता. मात्र आता पुन्हा एकदा शरद पवार आणि सत्यशील शेरकर यांची भेट होणार असल्याने ते राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याच्या चर्चांनी जोर धरलाय. येत्या २ नोव्हेंबरला शरद पवार हे जुन्नर तालुक्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू होत आहे. त्यानिमित्ताने शरद पवार यांच्या हस्ते गळीत हंगामाचा शुभारंभ होणार आहे. विघ्नहरच्या गळीत हंगामाचं निमित्त करून पुन्हा पवार-शेरकर यांची भेट होत असल्याने तालुक्याच्या राजकारणात मोठा उलटफेर होणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात होत आहेत. शरद पवार यांना शेतकऱ्यांची जाण असणारे नेते म्हणून ओळखले जाते. शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून ते नेहमीच रोखठोक भूमिका घेत असतात. कृषिमंत्री असताना केलेली दैदीप्यमान कामगिरी लाखो शेतकऱ्यांच्या लक्षात आहे. त्याच पार्श्वभूमीवर २ नोव्हेंबरला शरद पवार विघ्नहर कारखान्यावर येणार असल्याने राजकीय वातावरण बदलू लागले आहे. शरद पवार हे जुन्नरसाठी नव्या उमेदवाराची चाचपणी तर करत नाहीत ना? अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. याबाबत विघ्नहर कारखान्याचे संचालक सत्यशील शेरकर यांनी 'मटा ऑनलाइन'सोबत बोलताना सांगितले की, "शरद पवार हे विघ्नहर कारखान्याच्या गळीत हंगामासाठी येणार आहेत. पवारसाहेब हे शेतकऱ्यांची जाण असलेले नेते आहेत. ते जुन्नरमध्ये येत असले आणि माझ्या प्रवेशाबाबत चर्चा होत असली तरी

### शरद पवार जुन्नर दौऱ्यावर

» २ नोव्हेंबरला शरद पवार हे जुन्नर तालुक्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू होत आहे. त्यानिमित्ताने शरद पवार यांच्या हस्ते गळीत हंगामाचा शुभारंभ होणार आहे. विघ्नहरच्या गळीत हंगामाचं निमित्त करून पुन्हा पवार-शेरकर यांची भेट होत असल्याने तालुक्याच्या राजकारणात मोठा उलटफेर होणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात होत आहेत. शरद पवार यांना शेतकऱ्यांची जाण असणारे नेते म्हणून ओळखले जाते. शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून ते नेहमीच रोखठोक भूमिका घेत असतात. कृषिमंत्री असताना केलेली दैदीप्यमान कामगिरी लाखो शेतकऱ्यांच्या लक्षात आहे. त्याच पार्श्वभूमीवर २ नोव्हेंबरला शरद पवार विघ्नहर कारखान्यावर येणार असल्याने राजकीय वातावरण बदलू लागले आहे.

# पुणे-मुंबई एक्सप्रेस वे'वर विशेष ब्लॉक!

## » मुंबईकडे जाणारी वाहतूक 1 तासासाठी बंद

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मुंबई - द्रुतगती महामार्गावर मुंबईच्या.दिशेने बोरघाट हद्दीत किमी ४४/८०० आणि किमी ३७/८०० या ठिकाणी ग्रांटी बसविण्यासाठी उद्या (दि.२६) रोजी १२ ते १ असा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे या कालावधीत मुंबईकडील सर्व वाहतूक बंद करण्यात येणार आहे. तसेच अवजड वाहतूक उर्से टोलनाक्यावर थांबवण्यात येणार आहे.**



फक्त कार साठी किमी ५५ लोणावळा एक्झीट येथून जुना पुणे मुंबई महामार्ग - अंडा पॉईंट - द्रुतगती महामार्ग - खोपोली exit - इंदिरा चौक खोपोली मार्गे वाहतूक सुरू राहणार आहे. काम पुर्ण झाल्यावर दुपारी १ वाजता सदर वाहिनीवरील वाहतूक पुन्हा सुरु करण्यात येईल, असेही कळविण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्यावरून दिवसभरात लाखो वाहने ये - जा करत असतात. उद्या एक तासाचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार असून प्रवाशी नागरिकांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी या वेळेत प्रवास करणे टाळावे असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे या वेळेत महामार्गावरून प्रवास करणं टाळावे असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून द्रुतगती महामार्गावर विशेष ब्लॉक घेतला जात आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. ग्रँटी उभारण्यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना केल्या जात आहेत. त्या दृष्टिकोनातून हे ब्लॉक घेतले जात असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. उद्याचा ब्लॉक हा मुंबईच्या दिशेची वाहतूक बंद करण्यात येणार असून यावेळेत प्रवास न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### या वेळेत प्रवास करणे टाळावे

» काम पुर्ण झाल्यावर दुपारी १ वाजता सदर वाहिनीवरील वाहतूक पुन्हा सुरु करण्यात येईल, असेही कळविण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्यावरून दिवसभरात लाखो वाहने ये - जा करत असतात. उद्या एक तासाचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार असून प्रवाशी नागरिकांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी या वेळेत प्रवास करणे टाळावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुण्यात ओला-उबर आणि स्विगी झोमॅटोचा बंद!

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये ओला, उबर, स्विगी, झोमॅटो यांच्यासह ऑनलाईन सेवा देणाऱ्या पोर्टर, अर्बन या कंपन्या आणि मोबाइल ॲपसाठी काम करणारे कामगार एक दिवसाचा बंद पाळत आहेत. कंपन्यांकडून कामगारांची पिळवणूक केली जाते आहे. राजस्थानप्रमाणेच महाराष्ट्रात गिग कामगार नोंदणी कायदा लागू करण्यात यावा ही बंद पुकारणाऱ्या कामगारांची मागणी आहे. पुणे आणि पिंपरीत जो बंद पुकारण्यात आला आहे त्यावेळी ओला, उबरची टॅक्सी सेवा, स्विगी, झोमॅटोची फूड डिलिव्हरी बंद राहणार आहे. इंडियन गिग वर्कर्स फ्रंट या संघटनेच्या वतीने एक दिवसाचा हा बंद पुकारण्यात आला आहे. ओला, उबर टॅक्सीचे मूळ दर हे रिक्षा टॅक्सी मीटरप्रमाणेच निश्चित केले जावेत, त्यासाठी खटुआ समितीची शिफारस मान्य करावी. एव्हरेस्ट फ्लीट इत्यादी कंपन्यांनी सामान्य कॅब चालकांचा दैनंदिन व्यवसायात अडथळा निर्माण करु नये.टॅक्सीच्या फेरी दरम्यान चालकांना भेडसावणाऱ्या कोणत्याही समस्येचे निराकरण करण्यासाठी प्रभावी ऑनलाईन किंवा ऑफलाईन यंत्रणा तयार केल्या जाव्यात.आयडी ब्लॉक करणे किंवा कोणत्याही वाहनचालकाला दंड आकारण्यासारखी कोणतीही कारवाई करण्यापूर्वी प्रवाशांच्या तक्रारीची चौकशी करावीपिक-अप चार्जेस, वेटिंग चार्जेस, पॅसेंजर कॅन्सलेशन चार्जेस, नाईट चार्जेस पूर्वीप्रमाणेच असावेत. आयडी ब्लॉक करणे किंवा कोणत्याही डिलिव्हरी बॉयवर दंड ठोठावण्यासारखी कोणतीही कारवाई करण्यापूर्वी, ग्राहकाच्या तक्रारीची पडताळणी केली पाहिजे. जर हा हॉटेलचा दोष असेल तर फूड डिलिव्हरी करणाऱ्या व्यक्तीला दोष देऊ नये.

# भाजपा मनात... विधानसभेसाठी शिवबंधनात!

## » एकनाथ पवार यांची राजकीय चाल : जाणकारांकडून तर्कवितर्कांना उधाण

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड शहराचे भाजपाचे नेते शिवसेनेत डेरेदाखल झाले आहेत. त्या बाबत शहरात विशेष चर्चा रंगविण्यात आल्या नाहीत. याला कारण ते असे करतील, याचा अंदाज आधीच माध्यमांनी आणि राजकीय जाणकारांनी बांधला होता. घडलेही तसेच. मात्र, हा प्रवेश करण्यापूर्वी पवारांनी घेतलेली पत्रकार परिषद त्यांच्याच वक्तव्याचे दोन अर्थ काढणारी ठरली. या पत्रकार परिषदेत त्यांनी मराठा आरक्षणावरून थेट भाजपा आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'टार्गेट' न करता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली. यावरून त्यांच्या मनात भाजपा असल्याचे स्पष्ट होत आहे. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून विधानसभेचे स्वप्न पाहणाऱ्या पवारांनी तिकिटासाठी हातात शिवबंधन घातले आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सत्तारुढ पक्षनेते, भाजपा शहराध्यक्ष, भोसरी विधासभेची 2014 ची उमेदवारी, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जनआशिर्वाद यात्रेत नियोजनाची जबाबदारी, भाजपाचे प्रवक्ते आदीसह विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या भाजपाने एकनाथ पवार यांच्यावर सोपविल्या. या बरोबरच महापालिका निवडणूकीत 2017 रोजी त्यांच्या पुर्णानगर, संभाजीनगर या प्रभागातील उमेदवारांची निवड करण्याचाही त्यांना अधिकारी दिल्याची चर्चा आहे. एवढी मोकळीकता आणि ताकद देऊनही त्यांनी पक्षाला रामराम करून शिवसेनेत प्रवेश करत जय महाराष्ट्र केला. हा प्रवेश करण्यापुर्वी त्यांनी पिंपरीत पत्रकार परिषद आयोजित केली होती. यामध्ये मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी भाजप सोडत असल्याचा दिखावा केला. वास्तविक पाहता मराठा आरक्षण मिळावे, यासाठी भाजपामधील मराठा समाजाचा देखील आग्रह आहे. पक्षात राहूनच ते देखील आपली भूमिका मांडत आहेत. पक्ष सोडण्याची भूमिका त्या नेत्यांनी घेतलेली नाही. तसेच एकनाथ पवार यांना देखील गरज नव्हती. त्यांच्यावर पक्षाने अन्याय केलेला नाही, याची जाणीव देखील त्यांना आहे. मात्र पवारांना सध्या विधानसभेचे स्वप्न पडत असल्यानेच त्यांनी हा निर्णय घेतला असल्याची वस्तूस्थिती आहे.

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी पैकी पिंपरी विधानसभा आरक्षित आहे. चिंचवड विधानसभेत दावा करता येणार नाही. तर भोसरीमध्ये डाळ शिजणार नाही. ही राजकीय मर्यादा पाहून आपल्या गावी राजकीय कक्षा वाढविण्यास पवार यांनी सुरूवात केली. नांदेडमधील लोहा कंधार हा विधानसभा मतदारसंघ निवडत त्यांनी संघटन बांधणीला सुरूवात केली. 2019 मध्ये भाजपाकडून तिकिटासाठी प्रयत्न केले. मात्र त्याला यश आले नाही. सध्याही ती शाश्वती दिसत नाही. त्यामुळे राजकीय स्पेस पाहून आणि ठाकरे गटाची ताकद पाहून त्यांनी हातात शिवबंधन बांधले आहे. आगामी काळात ते ठाकरे गटाचे उमेदवार असतील, हे सध्या तरी शिक्कामोर्तब झाले आहे. त्यांच्या या राजकीय चालीला किती यश मिळणार हे पहावे लागणार

### प्रभागात चित्र बदलणार की जैसे थे...

»पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पुर्णानगर, संभाजीनगर प्रभागातील भाजपाचे उमेदवार निवडून आणण्यात त्यांनी मोठा वाटा उचलला आहे. या मतदारसंघात भाजपाला मानणारा मोठा वर्ग निर्माण झाला आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणूकीत एकनाथ पवार यांच्या बदलेल्या भूमिकेमुळे त्यांच्या प्रभागात बदल होणार की, भाजपाला साथ देणार हे पहावे लागणार आहे.

### तर भोसरी विधासनभेचाही पर्याय

» एकनाथ पवार यांनी सध्या तरी लोहा कंधारवर आपला दावा सांगितला आहे. मात्र भोसरी विधानसभेसाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेकडे सक्षम उमेदवार नाही. त्यामुळे भोसरी विधासभेवरही ते दावा करू शकतात अशी चर्चा आहे. दोन्ही पैकी एका विधासभेत पक्ष त्यांना लढविण्यासाठी मैदानात उतरवेल. तसे झालेच नाही, तर ती त्यांची राजकीय कोंडी देखील ठरण्याची शक्यता असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

# चिखलीसह समाविष्ट गावांतील पाणीपुरवठा सक्षम!

## » भाजपा आमदार महेश लांडगे यांचा; चिखली जलशुद्धीकरण केंद्रातील पंपाचे लोकार्पण

। पिंपरी ।महाईन्यूज ।

**समाविष्ट गावांच्या विकासाचा मुद्दा हातात घेवून आम्ही विकासकामांना गती देण्याची भूमिका घेतली आहे. नवीन पाणी उपसा पंपामुळे चिखली व परिसरातील पाणी पुरवठा सक्षम होणार आहे. समाविष्ट गावांतील पाणी प्रश्न सोडवण्यास आम्हाला यश मिळाले आहे, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला..**



चिखली आणि परिसरातील सुमारे ९० हजार नागरिकांच्या पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून थेट पाईपद्वारे पाटीलनगर येथील जलकुंभात पाणी पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र पंप बसवण्यात आला आहे. त्याचे लोकार्पण आमदार लांडगे व समस्थ ग्रामस्थ चिखली यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेवक सुरेश म्हेत्रे, कुंदन गायकवाड, सुनिल लोखंडे, दिनेश यादव, विनायक आबा मोरे, अंकुश मळेकर, अमृत सोनवणे, यशवंत साने, पांडाभाऊ साने, निलेश नेवाळे, किसन बावकर, प्रदीप आहेर, पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, जितेंद्र यादव, निलेश लोखंडे, नवीन बग, संतोष मोरे,संदीप शेलार, संतोष जाधव, दत्ता मोरे,गणेश भुजबळ, अविनाश मोरे, संदीप नेवाळे, तुकाराम जाधव, सदाशिव नेवाळे, सोनम मोरे, सविता दाते, किर्ती मोरे, प्रतिभा चौधरी, हेमलता सोनवणे, मनिषा ठोंबरे, कार्यकारी अभियंता रामनाथ टकले, मीनल दौंडल अभियंता रमेश जिंतीकर आदी उपस्थित होते.

माजी महापौर राहुल जाधव म्हणाले की, समाविष्ट गावे विकासापासून वंचित होते. मात्र, २०१४ मध्ये आमदार महेश लांडगे यांनी निवडून आल्यानंतर समाविष्ट गावांच्या विकास विकासाला चालना मिळाली. २०१७ मध्ये 'व्हीजन-२०२०' अंतर्गत समाविष्ट गावांसाठी पाणी पुरवठा सक्षम करण्यासाठी २०१७-१८ मध्ये आंद्रा पाणी प्रकल्पाला गती देण्यात आली.

> " आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पाला मंजुरी देण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे झपाट्याने विकसित होणाऱ्या समाविष्ट गावांसह पिंपरी-चिंचवडचा पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आम्ही शहराच्या पाणी प्रश्नाबाबत वेळोवेळी विधानसभा सभागृहात शहराची भूमिका मांडली. चिखली जलशुद्धीकरण केंद्रातील नव्याने सुरू केलेल्या पंपाच्या माध्यमातून चिखली आणि परिसरात पाणी पुरवठा सुरळीत होईल. आगामी काळात शहरातील पाणी पुरवठा सक्षमीकरणासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा. पिंपरी-चिंचवड.




# कारखानदार तुपाशी, शेतकरी उपाशी

**पाच सहकारी साखर कारखान्यांच्या ६३१ कोटी रुपयांच्या कर्जाला थकहमी देण्याचा आदेश राज्य शासनाने काढला आहे. साखर उद्योग अडचणीत असल्याने साखर कारखान्यांना मदत करावी लागते, असा सरकारचा दावा असतो. राज्यातील साखर कारखान्यांकडून शासनाला विविध कर रूपाने वर्षाला पाच हजार कोटींपेक्षा अधिक महसूल मिळतो.**

याशिवाय ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेला साखर कारखान्यांमुळे चालना मिळते म्हणूनच सहकारी साखर कारखान्यांना मदत केली जाते. याचाच भाग म्हणून सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जाला थकहमी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पहिल्या टप्प्यात पाच कारखान्यांच्या कर्जाला हमी देण्यात आली. साखर कारखान्यांकडून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकांकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाला सरकारची हमी असते. यामुळे साखर कारखानदारांवर बोजा पडत नाही आणि मालमत्ता तारण ठेवावी लागत नाही. सरकारची हमी असल्याने बँकाही कर्ज देण्यास काचकूच करीत नाहीत. चारच दिवसांपूर्वी सूत गिरण्यांच्या कर्जाचे व्याज सरकारने फेडण्याच्या योजनेला आणखी पाच वर्षे मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. यापाठोपाठ सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जाला सरकारची हमी मिळणार आहे. या



पाचपैकी एका कारखान्यावर काँग्रेस नेते माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची सत्ता आहे. तीन कारखाने हे अजित पवार यांच्या निकटवर्तीयांचे आहेत. आणखी एक कारखाना हा काँग्रेसचे माजी आमदार धनाजी साठे यांचा आहे. म्हणजेच राष्ट्रवादीचा अजित पवार गट आणि प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला शिंदे सरकारने झुकते माप दिले. विरोधकांच्या संस्थांना मदत केल्यास ओरड होत नाही हे तत्त्व शिंदे यांनी बरोबर पाळले आहे. कराची रक्कम भरली नाही म्हणून भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या वैद्यानाथ साखर कारखान्यावर अलीकडेच जीएसटी विभागाने छापे घातले. केंद्र व राज्यात पक्ष सत्तेत असताना आपल्याविरोधात कारवाई करण्यात आल्याबद्दल पंकजा मुंडे यांनी नाराजी बोलून दाखविली. पण त्याच वेळी काँग्रेसच्या अ. भा. कार्यकारी समितीचे सदस्य असलेल्या अशोक चव्हाण यांच्या कारखान्याला सरकारी मदत दिली जाते यावरून सत्ताधाऱ्यांच्या खेळीचा अंदाज येतो. पंकजा मुंडे यांच्या कारखान्याच्या कर्जाला हमी देण्यास यापूर्वी सरकारने नकार दिला होता ही बाबही दुर्लक्षित करता येणार नाही. राज्यातील काही साखर कारखाने अडचणीत असल्याने त्यांना 'मार्जिन मनी लोन'अंतर्गत मदत करण्यात आल्याचे सरकारी आदेशात नमूद करण्यात आले आहे. यंदाच्या हंगामात साखर पट्ट्यात तुलनेत कमी पाऊस झाला. त्याचा पुढील हंगामावर नक्कीच परिणाम होईल. पण गेली दोन-तीन वर्षे चांगला पाऊस झाला होता. उसाचे उत्पादन चांगले झाले होते. साखरेचा उताराही चांगला होता. मग शासन म्हणते त्याप्रमाणे 'काही साखर कारखाने' अडचणीत का आले? याचा सरकारने कधी विचार केला आहे का? शेतकऱ्यांना रास्त आणि किफायतशीर भाव द्यायचा नाही, शेतकऱ्यांचे चुकारे चुकवायचे हे सारे उद्योग काही कारखानदारांकडून केले जातात. यामुळेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या दरावरून साखर कारखान्यांच्या विरोधातील आंदोलनाला पश्चिम महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद मिळतो हे ओघानेच आले. साखर उद्योग अडचणीत म्हणून सरकारी सवलती किंवा मदत लुबाडायची आणि दुसरीकडे शेतकऱ्यांना रडवायचे हे वर्षानुवर्षे सुरू आहे. राज्य शासनाने पाच कारखान्यांच्या कर्जाला थकहमी दिली. याआधी भाजपच्या साखरसम्राटांच्या कारखान्यांच्या ५५० कोटींच्या कर्जाला राज्य सरकारने हमी दिली होती. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सहकार विकास मंडळाच्या माध्यमातून भाजपशी संबंधित नेत्यांच्या कारखान्यांना कर्ज देण्याची योजना होती. पण कर्जासाठी अटींची पूर्तता करण्यात अयशस्वी ठरलेले कारखानदार अपात्र ठरले. तरीही राज्य सरकारने रावसाहेब दानवे, हर्षवर्धन पाटील, विजयसिंह मोहिते-पाटील, धनंजय महाडिक या भाजप नेत्यांच्या कारखान्यांवर कृपादृष्टी दाखविली. आता सत्तेत सहभागी झालेल्या अजित पवार यांच्या गटाला खूश करण्याचा प्रयत्न झाला. राजकीय नेत्यांचे भले करण्यासाठीच सरकारी निधीचा वापर होतो हेच यातून समोर येते.

## संपादकीय »

# सरळमार्गी वळणदार

***विविध भूमिकांमधून क्रिकेटशी संबद्ध राहिलेल्या बिशनसिंग बेदींची मूल्ये आणि निष्ठा कधीही विचलित झाल्या नाहीत.***

बिशनसिंग बेदी यांची डावखुरी गोलंदाजी म्हणजे जणू अनेक नैपुण्यांचा एकत्रित आविष्कारच. पदलालित्य, मनगटावरील नियंत्रण, अंगुलीकला, एकाग्रता, आत्मविश्वास आणि या सर्वांच्या जोडीला दिलेर स्वभाव... 'पोएट्री इन मोशन' असे त्यांच्या नितांतसुंदर आणि वैशिष्ट्यपूर्ण गोलंदाजी शैलीचे यथार्थ वर्णन इंग्लिश क्रिकेट समीक्षकांनी केले होते. छोटीशीच धाव घेत एखाद्या नर्तकासारखा शरीराला झोक देत बेदी चेंडूला गती, उंची, दिशा आणि वळणही द्यायचे. फिरकी गोलंदाजी करतानाची बेदींची स्थिरचित्रे त्यामुळे एखाद्या निष्णात नर्तकाच्या मुद्रेसारखी भासतात. ती पाहताना आज जसे आपण खिळून जातो, तसे त्या काळी फलंदाजही खेळपट्टीवर खिळून जायचे. खरे तर त्या काळातील अनेक गोऱ्या क्रिकेट लेखकांच्या नजरेतून भारतीय क्रिकेटपटू म्हणजे कारागीर/कलाकार अधिक आणि खेळाडू कमी असायचे. म्हणजे बोटांत नि मनगटात कला आहे.

**प्रत्येक नोकरीइच्छुक उमेदवाराला रोजगार मिळवून देणे, युवक-युवती, महिला, नवनवीन संकल्पनांतून पुढे आलेल्या नवउद्योगांना प्रोत्साहन आणि चालना देणे, उद्योगांमधील बदलत्या तंत्रज्ञानास अनुसरून आयटीआयमधील अभ्यासक्रमांचे तसेच आयटीआयचे आधुनिकीकरण करणे यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री पवार यांच्या नेतृत्वाखाली उद्योजकता आणि नावीन्य विभागाने पुढाकार घेतला आहे.**

# कुशल, रोजगारक्षम राज्यासाठी..!

कुशल आणि रोजगारयुक्त महाराष्ट्र घडविण्याच्या उद्देशाने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत विद्यार्थी, युवक-युवतींसाठी राज्यातील ३६ जिल्ह्यांत जिल्हास्तरावर तसेच राज्यातील सर्व २८८ मतदारसंघांत ६ मे ते ६ जून २०२३ या कालावधीत 'छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरां'चे आयोजन करण्यात आले. या करिअर शिबिरांच्या माध्यमातून विद्यार्थी, युवक-युवतींना विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन देण्यात आले याचा मोठ्या प्रमाणात लाभ झाला आहे. विभागामार्फत त्याचबरोबर राज्यात सध्या मोठ्या प्रमाणात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. ठिकठिकाणी हजारो विद्यार्थी या मेळाव्यांत सहभागी होत असून नोकरीसाठी विविध कंपन्यांत मुलाखती देत आहेत. याशिवाय महास्वयम संकेतस्थळ आणि विभागाच्या इतर विविध उपक्रमांद्वारे राज्यात विविध



कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योगांमध्ये एप्रिल २०२३ मध्ये १३ हजार ८२ बेरोजगार उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात आला. विभागाकडे तसेच महास्वयम संकेतस्थळावर आतापर्यंत एक लाख चार हजार ८७ इतक्या सार्वजनिक व खासगी उद्योजकांनी नोंदणी केली आहे. जानेवारी ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत ऑनलाइन आणि ऑफलाइन स्वरूपात २९० मेळावे घेण्यात आले. यामध्ये एक लाख ४० हजार ११० युवक आणि युवतींना रोजगार प्राप्त झाला आहे. आतापर्यंत विभागीय रोजगार मेळाव्यासाठी एक लाख रुपये, तर जिल्हास्तरावरील रोजगार मेळाव्यासाठी ४० ते ६० हजार रुपयांपर्यंत खर्च करण्याची मर्यादा होती. मेळावे अधिक प्रभावीरीत्या राबविण्यासाठी ही मर्यादा २०२३ पासून पाच लाख रुपयांनी वाढविण्यात आली. राज्यातील युवक-युवतींना रोजगार उपलब्ध व्हावेत, यासाठी विभागामार्फत विविध एक हजार १७५ नामांकित उद्योजक, कॉर्पोरेट संस्था, औद्योगिक संघटना, प्लेसमेंट एजन्सी यांच्यासमवेत सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या करारांमार्फत राज्यातील सहा लाख ८६ हजार युवक, युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. जागतिक बँकेच्या तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यातून विभागात विविध प्रकल्प, उपक्रम राबवण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात किमान एक मॉडेल आयटीआय आणि राज्यात मुलींसाठी १७ मॉडेल आयटीआय असे एकूण ५३ मॉडेल आयटीआय स्थापन करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर सर्व सुविधांनी युक्त असे जागतिक स्किल सेंटर उभारण्यात येणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आरक्षणासाठी 'गावबंदी'चे लोण!

## मराठवाड्यातील 600 गावांत पुढाऱ्यांना बंदी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणासाठी जालन्यामध्ये मनोज जरांगे-पाटील यांनी बुधवारपासून पुन्हा बेमुदत उपोषण सुरू केले असताना पुढाऱ्यांना गावबंदीचे लोण मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत पसरले आहे. जालन्यातील सुमारे १५० गावांनी गावबंदीची घोषणा केली असून, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांतील प्रत्येकी सुमारे १०० गावांनीही गावबंदीचे फलक झळकविले आहेत.**






जरांगे यांनी बुधवारी उपोषणाला प्रारंभ करण्यापूर्वीच त्यांच्या समर्थनार्थ मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात त्यांचे अनुयायी एकवटले होते. हिंगोली जिल्ह्यातील १०० गावांनी पुढाऱ्यांना बंदी घातली आहे. नांदेड जिल्ह्यात शंभराहून अधिक गावांनी राजकीय नेते व लोकप्रतिनिधींसाठी गावबंदी लागू केली असून काही प्रमुख गावांमध्ये आरक्षण समर्थकांनी साखळी उपोषण सुरू केले आहे. विशेष म्हणजे मराठेतर सरपंच असलेल्या गावांनीही आरक्षणाची मागणी उचलून धरत गावबंदी जाहीर केल्याचा दावा केला जात आहे. दसऱ्याच्या दिवशी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण अर्धापूर तालुक्यातील त्यांच्या आपल्या साखर कारखान्यामध्ये सुरू असलेल्या भाषणादरम्यान घोषणाबाजी झाली. काही ग्रामपंचायतींनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचे ठराव जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयांकडे पाठविले आहेत. धाराशिव जिल्ह्यात शंभर गावांनी गावबंदी जाहीर केली असून सर्वाधिक ४० गावे एकट्या परंडा तालुक्यात आहेत. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिलेला अल्टिमेटम २४ ऑक्टोबर रोजी संपला आहे. अल्टिमेटम संपूनही सरकारने कोणताही निर्णय न घेतल्याने मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आंदोलनाच्या मैदानात उतरले आहेत. त्यांनी आमरण उपोषण सुरू केलं आहे. जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत अन्नाचा एक कणही खाणार नाही आणि वैद्यकीय उपचारही घेतले जाणार नाहीत, अशी कठोर भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. मनोज जरांगेंनी पुन्हा उपोषण सुरू केल्याने सरकारसमोरील मराठा आरक्षणाचा पेच वाढला आहे.

राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी मनोज जरांगेंकडे आणखी वेळ वाढवून मागितला आहे. मराठा समाजाला कायमस्वरुपी आरक्षण हवं असेल तर मनोज जरांगे यांनी आणखी थोडा वेळ वाढवून दिला पाहिजे. कारण मराठा आरक्षणाचा निर्णय अंतिम टप्प्यात आला आहे, असं सूचक विधान शंभूराज देसाई यांनी केलं. शंभूराज देसाई यावेळी म्हणाले, "मराठा आरक्षणाबाबत कायदेशीर बाजू समजून घ्यायला हवी. आम्ही दिलेलं आरक्षण उच्च न्यायालयात दीड वर्षे टिकलं. त्याला कुठेही बाधा आली नाही. ज्या-ज्या वेळी मराठा आरक्षण समितीची बैठक होते, तेव्हा एकनाथ शिंदे स्वत: सर्व माहिती घेतात. बैठकीत काय निर्णय झाला? कशापद्धतीने तो निर्णय पुढे चालला आहे? काहीही झालं तर आपल्याला कायमस्वरुपी आरक्षण मिळणार, अशा पद्धतीने बारकाईने एकनाथ शिंदेंचं याकडे लक्ष आहे.

### शिंदे-फडणवीसांची शहांशी चर्चा

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुधवारी नवी दिल्लीला दाखल झाले. त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. रात्री उशिरापर्यंत ही बैठक सुरू होती. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा शिथिल करून मराठा आरक्षण देता येईल का, याबाबत विचारविनिमय सुरू असल्याचे समजते. गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी शिर्डीमध्ये येणार असून त्यावेळी ते शिंदे, फडणवीस त्यांच्याशीही चर्चा करण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, शिंदे आणि फडणवीस यांच्या दिल्ली दौऱ्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विचारले असता, 'ते मला विचारून दिल्लीला गेलेले नाहीत' असे उत्तर त्यांनी दिल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या.

# कंत्राटी डॉक्टर-कर्मचाऱ्यांचे आंदोलन!

## माता-बालकांच्या लसीकरणाचे काम ठप्प ?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आरोग्य विभागातील एकीकडे जवळपास १७ हजारांहून अधिक पदे रिक्त असताना आता 'राष्ट्रीय आरोग्य अभियानां'तर्गत काम करणारे सुमारे ३५ हजार कंत्राटी डॉक्टर, क्षयरोग कर्मचारी, तंत्रज्ञ, परिचारिकांनी आरोग्य सेवेत सामावून घेण्यासाठी कामबंद आंदोलन सुरु केले आहे.**



या आंदोलनामुळे माता-बालकांच्या लसीकरणाचे काम ठप्प होणार असून डायलिसिस सेवा तसेच क्षयरुग्णांच्या नोंदणीपासून औषधोपचारापर्यंत तसेच आरोग्य विषयक सर्व नोंदणीचे काम बंद होण्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे.

येत्या ३० व ३१ ऑक्टोबर रोजी आझाद मैदानावर हे सर्व आरोग्य सेवक आंदोलन करणार आहेत. आंदोलनात आयुषअंतर्गत काम करणारे ६५० डॉक्टर्स तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजनेअंतर्गत २५०० डॉक्टर्स, क्षयरोग विभागातील २५७३ कर्मचारी व तंत्रज्ञ, २००० प्रयोगशाळा तंत्रज्ञ आणि सुमारे ४००० अर्धपरिचारिका, ८५०० समुदाय वैद्यकीय अधिकारी तसेच अन्य आरोग्य कर्मचारी अशा सुमारे ३५ हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांनी बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या वेगवेगळ्या डॉक्टर, तंत्रज्ञ, क्षयरोग कर्मचारी आदी ११ संघटनांनी एकत्र येऊन २५ ऑक्टोबरपासून हे कामबंद व लेखणीबंद आंदोलन पुकारले आहे. बुधवारी या सर्व संघटनांच्या प्रतिनिधींची आरोग्य आयुक्त धीरजकुमार यांच्यासमवेत बैठक झाली. या बैठकीत संघटनांच्या प्रतिनिधींनी ओरिसा, मणिपूर, राजस्थान, पंजाब, आंध्र प्रदेश, तलंगणा तसेच मध्यप्रदेशमध्ये तेथील सरकारने आरोग्य विभागातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गतच्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले असून त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही आम्हाला आरोग्य सेवेत कायम करा अशी मागणी करण्यात आली.

# सुप्रिया सुळेंचे ड्रग्स तस्करांशी संबंध?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

राज्यात अमली पदार्थ तस्करीचं प्रकरण मोठ्या प्रमाणात गाजतंय. ललित पाटील प्रकरणामुळे विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर आसूड ओढले आहेत. तर, ठाकरे गटाकडून नाशिकमध्ये मोठं आंदोलनही छेडण्यात आलं होतं.

तसंच, सुप्रिया सुळे यांनीही याप्रकरणी राज्य सरकारला खडेबोल सुनावले होते. या सर्व पार्श्वभूमीवर शिंदे गटाच्या आमदार मनीषा कायंदे यांनी राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

मनीषा कायंदे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन जितेंद्र आव्हाडांचा संशयित ड्रग्स तस्करांशी संबंध असल्याचा मोठा दावा केला. तसंच, विविध संशयित ड्रग्स तस्करांसोबत असलेले आव्हांडांचे फोटोही माध्यमांना दाखवले. यावेळी त्यांनी सुप्रिया सुळे यांच्यावरही टीका केली. शानू पठाण, सलमान फाळके या ड्रग्स प्रकरणातील संशयित आरोपींची जितेंद्र आव्हाड आणि सुप्रिया सुळेंचा संबंध असल्याचं त्या म्हणाल्या. मनीषा कायंदे म्हणाल्या की, काही दिवसांपूर्वी ललित पाटील याला ड्रग्स प्रकरणात अटक झाली. २०२० मध्ये तो शिवसेनेचा कार्यकर्ता होता आणि आताही असेल. अमली पदार्थ प्रकरणात सात ते आठ नावं समोर आली आहेत. यानंतर मोठं नाव समोर आलं ते कळवा मुंब्रा विभागातून सलमान फाळके याचं.

# मोदी सरकार सत्तेत येणार नाही!

## » राहुल गांधींना दिलेल्या मुलाखतीत मलिक यांचा दावा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांची मुलाखत सध्या सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. या दोन दिग्गज नेत्यांच्या 28 मिनिटांच्या या संभाषणात राहुल गांधींनी सत्यपाल मलिक यांच्याशी पुलवामा हल्ला, शेतकरी आंदोलन, एमएसपी, जातिगणना, मणिपूर हिंसाचार यासह विविध मुद्द्यांबाबत संवाद साधला आहे. या मुलाखती दरम्यान सत्यपाल मलिक यांनी मोदी सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी, मी लिहून देतो, मोदी सरकार सत्तेत येणार नाही, असे ठणकावून सांगितले आहे. त्यांचे हे विधान सोशल मीडियावर ट्रेंडिगला आहे.**

यावेळी जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक म्हणाले, मी स्पष्टपणे सांगतो की, जम्मू-काश्मीरच्या लोकांवर बळाचा वापर करुन काहीही फायदा होणार नाही. तेथील लोकांना प्रेमाने आणि विश्वासाने जिंकूनच तुम्हाला ते हवं ते साध्य करता येईल. त्यांना राज्याचा दर्जा परत मिळावा, असे मलाही वाटते. त्यांनी कलम 370 मागे घेत केंद्रशासित प्रदेशाची निर्मिती केली. राज्याचे पोलीस बंड करतील, अशी भीती त्यांना वाटत होती. पण, जम्मू-काश्मीर पोलिसांनी केंद्र सरकारला नेहमीच पाठिंबा दिला आहे. अमित शहा यांनी राज्याचा दर्जा परत करू असे आश्वासन दिले आहे. त्यामुळे त्यांनी लवकरात लवकर जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा परत करून तेथे निवडणुका घ्याव्यात, असं मलिक म्हणाले. राहुल गांधी यांनी पुलवामा हल्ल्याबद्दल विचारलं असता सत्यपाल मलिक म्हणाले की, "यांनी पुलवामा हल्ला केला असं मी म्हणणार नाही. पण यांनी त्याकडे दुर्लक्ष केलं आणि राजकीय फायदा उचलला. मतदान करायला जाल तेव्हा पुलवामामधील शहीदांचा आठवण ठेवा असं त्यांचं वाक्य आहे". यावेळी राहुल गांधींनी सांगितलं की, विमानतळावर जेव्हा शहिदांचे पार्थिव आणण्यात आले, तेव्हा मला रुममध्ये बंद करण्यात आलं होतं. मी भांडून तेथून बाहेर पडलो होतो. जम्मू काश्मीरचे लोक हे प्रेमळ आहेत. तुम्ही तिथल्या लोकांवर सक्तीने कुठलाही निर्णय लादू शकत नाही. लष्कराच्या हाती त्यांचे प्रश्न देऊन तिथले प्रश्न सुटणार नाहीत. त्याउलट तुम्ही (सरकारने) त्यांची मनं जिंकली तर जम्मू काश्मीरचे लोक तुमच्यावर विश्वास ठेवतील. जेव्हा मी राज्यपाल होतो मी त्यांचा विश्वास संपादन केला होता. असं सत्यपाल मलिक यांनी म्हटलं आहे. मोदी सरकारने अनुच्छेद ३७० रद्द करुन हे राज्य केंद्रशासित केलं. त्यांना वाटलं होतं की पोलीस बंड करतील. मात्र जम्मू काश्मीरच्या पोलिसांनी केंद्र सरकारची साथ दिली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आश्वासन दिलं आहे की ते लवकरच जम्मू काश्मीरला राज्याचा दर्जा देतील. तसं करायचं असेल तर सरकारने तिकडे निवडणूक घेतली पाहिजे असंही मलिक म्हणाले. RSS च्या विचारधारेबाबत काय वाटतं? मला वाटतं की भारताच्या राजकारणात दोन विचारधारा आहेत. एक गांधी विचारधारा आणि दुसरी RSS ची विचारधारा. एक अहिंसा आणि बंधुभाव सांगणारी विचारधारा आहे. तर दुसरी विचारधारा हिंसेवर आणि तिरस्कारावर बेतलेली आहे. तुमचं मत काय? असं राहुल गांधींनी विचारलं. त्यानंतर मलिक म्हणाले, "माझा विचार असा आहे की देशाला आता लिबरल हिंदुत्वाची गरज आहे आणि तो दृष्टीकोन महात्मा गांधींचा होता. त्यासाठी त्यांनी खेड्याकडे चला हा मंत्री दिला होता. जर आपला देश या विचारधारेवर चालला तरच व्यवस्थित गोष्टी पुढेही घडतील. अन्यथा देशाचे आणखी तुकडे होण्याची भीती नाकारता येत नाही. महात्मा गांधींचा विचार हा देश जोडणारा आणि बंधुभाव जपणारा विचार होता. आज त्याच विचाराची गरज देशाला आहे.

### काश्मीरबाबत काय म्हणाले मलिक ?

» जम्मू काश्मीरचे लोक हे प्रेमळ आहेत. तुम्ही तिथल्या लोकांवर सक्तीने कुठलाही निर्णय लादू शकत नाही. लष्कराच्या हाती त्यांचे प्रश्न देऊन तिथले प्रश्न सुटणार नाहीत. त्याउलट तुम्ही (सरकारने) त्यांची मनं जिंकली तर जम्मू काश्मीरचे लोक तुमच्यावर विश्वास ठेवतील. जेव्हा मी राज्यपाल होतो मी त्यांचा विश्वास संपादन केला होता. असं सत्यपाल मलिक यांनी म्हटलं आहे. मोदी सरकारने अनुच्छेद ३७० रद्द करुन हे राज्य केंद्रशासित केलं. त्यांना वाटलं होतं की पोलीस बंड करतील. मात्र जम्मू काश्मीरच्या पोलिसांनी केंद्र सरकारची साथ दिली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आश्वासन दिलं आहे की ते लवकरच जम्मू काश्मीरला राज्याचा दर्जा देतील. तसं करायचं असेल तर सरकारने तिकडे निवडणूक घेतली पाहिजे असंही मलिक म्हणाले.

# हमास दहशतवादी संघटना नाही!

## » हमासचे भूमी रक्षणसाठी संघर्ष : एर्दोगन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**इस्रायल विरुद्ध हमास युद्ध सुरू झाल्यापासून आतापर्यंत हजारो नागरिकांचे प्राण गेले आहेत. दोहोंकडून तुफान हल्ले होत असल्याने इस्रायल आणि पॅलेस्टाईन देशातील नागरिकांचे बळी जात आहेत. तसंच इस्रायलने गाझा पट्टीवर आक्रमणाला सुरुवात केल्यानंतर तिथं मानवतावादी सुविधांचीही वानवा झाली आहे. मुलभूत गरजांसाठीही नागरिकांची ससेहोलपट होत आहे.**

दरम्यान, या सर्व पार्श्वभूमीवर तुर्कीचे राष्ट्राध्यक्ष तय्यप एर्दोगन यांनी मोठा दावा केला आहे. "हमास ही दहशतवादी संघटना नसून ती एक मुक्ति संघटना आहे, जी आपल्या भूमीचे रक्षण करण्यासाठी संघर्ष करत आहे, असं तुर्कीचे राष्ट्राध्यक्ष तय्यप एर्दोगन यांनी म्हटलं आहे. ते तुर्कीच्या संसदेत बोलत होते. इस्रायल आणि हमासने आता तत्काळ युद्धविराम करावे. तसंच, शाश्वत शांततेसाठी मुस्लीम राष्ट्रांनी एक होऊन काम केलं पाहिजे, असं आवाहनही त्यांनी केली. गाझावरील हल्ले थांबवण्यासाठी इस्रायलवर दबाव टाकावा, अशी विनंतीही एर्दोगन यांनी जागतिक शक्तींना केली. मानवतावादी मदतीसाठी रफाह सीमा गेट उघडे ठेवले पाहिजे आणि दोन्ही बाजूंमधील ओलिसांची देवाणघेवाण तातडीने पूर्ण करावी, असंही एर्दोगन म्हणाले. इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्ध थांबविण्यास संयुक्त राष्ट्रांच्या अक्षमतेबद्दलही त्यांनी निराशा व्यक्त केली. इस्रायल व हमासमधील युद्ध अद्याप चालूच असून हमासचे दहशतवादी माघार घेण्यास तयार नाहीत. यूएनकडून पुरवण्यात येणारी जीवनावश्यक सामग्री गाझा पट्टीत जाऊ देण्यास इस्रायलनं परवानगी दिली असली, तरी अद्याप गाझा पट्टीतील बॉम्बहल्ले व हवाई हल्ले चालूच आहेत. आता जमिनीवरून गाझा पट्टीत हल्ला करण्याचं नियोजन इस्रायलनं केलं असून हमासचा पूर्णपणे खात्मा करण्याचा निर्धार इस्रायलनं स्पष्ट केला आहे.

# राजकुमार राववर खास जबाबदारी!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

भारतीय निवडणूक आयोगाने अभिनेता राजकुमार रावची नियुक्ती नॅशनल आयकॉन म्हणून करण्याचा निर्णय घेतला आहे. २६ ऑक्टोबर २०२३ या दिवशी त्याची नियुक्ती नॅशनल आयकॉन म्हणून करण्यात येणार आहे. भारतीय निवडणूक आयोगाने राजकुमार राववर खास जबाबदारी टाकण्याचं ठरवलं आहे. २६ ऑक्टोबरला म्हणजेच गुरुवारी याविषयीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. भारतातल्या पाच राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. भारतीय निवडणूक आयोगाने या महिन्याच्या सुरुवातीलाच ही घोषणा केली. आता विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन करताना अभिनेता राजकुमार राव दिसणार आहे. राजकुमार राव हा त्याच्या प्रत्येक भूमिकेला न्याय देत असतो. त्याचप्रमाणे तो ही नवी जबाबदारीही चोखपणे पार पाडेल असा विश्वास निवडणूक आयोगाला वाटतो आहे. विधानसभेची निवडणूक छत्तीगडमध्ये ७ ते १७ नोव्हेंबरच्या दरम्यान दोन टप्प्यात निवडणूक होणार आहे. मध्यप्रदेश आणि तेलंगण या ठिकाणी १७ आणि ३० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. राजस्थानमध्ये २३ नोव्हेंबरला मतदान होणार होतं पण ते आता २५ नोव्हेंबरला होणार आहे .

# प्राजक्ता माळीने नेसली ईको फ्रेंडली साडी!

मराठी सिनेसृष्टीत स्वत:च्या सौंदर्याने आणि अभिनयाने चाहत्यांच्या मनावर राज्य करणारी अभिनेत्री प्राजक्ता माळी. आणि राजकारणातील चर्चित व्यक्तिमत्व म्हणजे केंद्रिय मंत्री नितीन गडकरी. योगायोगाने या दोघांची भेट घडली. प्राजक्ता माळीने तिच्या इन्स्ट्राग्रामवर पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने गडकरींसोबतच्या भेटीतील अनुभव थोडक्यात शेअर केलाय. प्राजक्ता माळी वेगवेगळ्या कारणाने कायम चर्चेत असते. सोशल मीडियावरही ती कायम ॲक्टिव्ह असते. तिच्या साड्यांची चर्चा कायम महिलांमध्ये दिसून येते. अलीकडेच तिने तिच्या इन्स्ट्राग्राम अकाउंटवर एक पोस्ट शेअर केलेली आहे. या पोस्टमध्ये तिने गडकरींसोबत झालेल्या भेटीनंतर त्यांच्याकडून भेट म्हणून मिळालेल्या साडीचा उल्लेख केलाय. नागपूरला एका कार्यक्रमानिमित्त प्राजक्ता आणि गडकरींचा एकाच मंचावर उपस्थित राहण्याचा योग काही कारणाने जुळून येता येता राहिला. त्यावेळी प्राजक्ताने कार्यक्रमाच्या आयोजकांना एक छोटीशी विनंती केली होती. ती अशी की,"सहज गडकरी साहेबांची भेट शक्य झाल्यास मला फार आवडेल." हे कळताच गडकरींनी तात्काळ प्राजक्ताला वेळ दिला. या भेटीत महाराष्ट्राच्या हास्यजत्रेतील काही पुढील कार्यक्रम, प्राजक्तराज, समृद्धी महामार्ग अशा बऱ्याच विषयांवर चर्चा झाली. यावेळी गडकरी प्राजक्ताची हास्यजत्रा बघतात हे कळल्यानं तिचा आनंद द्विगुणीत झाला. प्राजक्ताला यावेळी निघताना गडकरींनी यावेळी त्यांच्या घरातील देवीचे दर्शन घ्यायला लावले. सोबतच त्यांच्या कामावर लिहीलेली ८-९ पुस्तकं दिली. विशेष म्हणजे या भेटीत गडकरींनी प्राजक्ताला नैसर्गिक कापसापासून बनवलेली खादी साडी दिली. ही साडी प्राजक्ताने विजयादशमीच्या उत्सवातसुद्धा नेसली होती.



## तू काही माधुरी दीक्षित नाही

बॉलीवूडमध्ये ९० च्या दशकांत ज्या अभिनेत्रींनी वेगळी ओळख चाहत्यांच्या मनात तयार केली त्यात माधुरी दीक्षित आणि जुही चावलाचे नाव घ्यावे लागेल. या दोन्ही अभिनेत्रींनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले. माधुरीचा डान्स, अभिनय याची भुरळ अजूनही प्रेक्षकांना त्या काळाची आठवण करुन देते. आता जुही चावलानं एका मुलाखतीमधून राजा हिंदूस्थानी या चित्रपटाच्यावेळचा तो किस्सा समोर आला आहे. त्यामुळे जुही पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. सोशल मीडियावर देखील त्यारुन वेगळ्याच चर्चेला सुरुवात झाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून जुही चावला ही वेगवेगळ्या कारणांमुळे बातमीचा विषय आहे. तिनं मुंबईमध्ये मोबाईल टॉवरमुळे पक्षांना होणाऱ्या त्रासाविषयी न्यायालयात धाव घेतली होती. जुहीनं त्या मुलाखतीमध्ये सांगितलं की, तिला राजा हिंदूस्थानीमध्ये प्रमुख भूमिका मिळणार होती. मात्र ती मिळाली नाही. त्यातून जुही नाराज झाली होती. प्रसिद्ध फिल्ममेकर धर्मेश दर्शन यांनी जुहीची तुलना त्यावेळी माधुरी दीक्षित सोबत केली होती. त्यामुळे जुही चर्चेतही आली होती. आता तिनं त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. धर्मेश यांनी देखील आपण जुहीची तुलना माधुरी सोबत करुन तिच्या भावना दुखावल्या होत्या. जुहीला त्याचे वाईट वाटले होते. राजा हिंदुस्थानीमध्ये धर्मेश यांना जुही प्रमुख अभिनेत्री म्हणून हवी होती. मात्र ते शक्य झाले नाही. त्यावेळी त्यांनी करिश्मा कपूरशी संपर्क साधला. त्यामुळे त्यांना करिश्माकडे जावे लागले होते.

## नवऱ्याला लिपस्टिक आवडत नाही!



प्रसिद्ध अभिनेता रणबीर कपूर आणि आलिया भट्ट हे बी टाऊन कपल आता वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आले आहे. दोघेही बॉलीवूडमध्ये सर्वाधिक लाईमलाईटमध्ये असणारे कपल आहे. ब्रम्हास्त्रमध्ये त्यांनी कमाल केली होती. त्याचा दुसरा भाग पुढील वर्षी प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची चर्चा आहे. आलियाला नुकताच सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. गंगुबाई काठियावाडी मधील तिच्या भूमिकेनं चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. त्या भूमिकेचे कौतुकही झाले होते. त्या भूमिकेसाठी परिक्षकांनी तिची राष्ट्रीय पुरस्कारानं गौरविण्यात आले आहे. दुसरीकडे काही दिवसांपूर्वी तिच्या एका प्रतिक्रियेमुळे रणबीरला नेटकऱ्यांनी ट्रोल केले आहे. रणबीरनं मला बाहेर जाताना लिपस्टिक पुसण्यास सांगितली होती. त्यामुळे मला खूप राग आला होता. आणि नवलही वाटले होते. अशी प्रतिक्रिया दिली होती. त्यावरुन रणबीरला नेटकऱ्यांनी ट्रोल केले होते. रणबीरला माझे लिपस्टिक लावणे आवडले नव्हते. रणबीरच्या अशा वागण्यानं सोशल मीडियावर वेगळ्याच चर्चेला सुरुवात झाली होती. नेटकऱ्यांनी आलियाला तुला आता रणबीरकडून वेगळी आचारसंहिता लिहून घेण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया दिल्या होत्या. या सगळ्यात रणबीरनं त्यावर दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आली आहे. आलियानं लिपस्टिक लावू नये कारण तिचा नैसर्गिकपणा रणबीरला आवडतो. रणबीर म्हणतो, मला ज्याप्रकारे बोलले जाते किंवा ट्रोल केले जाते ते चूकीचे आहे. अनेकांना मला काय महत्वाचे वाटते हे जाणून घ्यायचे नाही. झूम सेशनमधून चाहत्यांशी संवाद साधताना त्यानं त्या प्रतिक्रियेवर स्पष्टीकरण दिले आहे. मी त्या सोशल मीडियावर नाही. त्यामुळे मला त्या लोकांना प्रतिक्रिया देणं फारसं महत्वाचं वाटत नाही. मला वाटतं काही अंशी नकारात्मकता महत्वाची आहे. एक कलाकार म्हणून तुम्हाला ती मदत करते. तुम्ही त्याचा सकारात्मक विचार करणे गरजेचे आहे. कधी कधी एक सेलिब्रेटी म्हणून तुमच्याविषयी खूप काही लिहिले जाते बोलले जाते. मात्र त्या प्रत्येक गोष्टीवर तुम्ही प्रतिक्रिया देणे महत्वाचे नाही. लोकांना माझ्या कामाविषयी बोलण्याची परवानगी आहे. त्यावर त्यांची प्रतिक्रिया महत्वाची ठरते. पण म्हणून त्यांनी कोणत्याही गोष्टीवरून आम्हा कलाकारांना दोष देणे चूकीचे आहे. असेही रणबीरनं यावेळी सांगितले.

## 33 वर्षांनंतर मी पुन्हा माझ्या गुरुसोबत

मनोरंजन विश्वातील असे सुपरस्टार ज्यांनी आपल्या अभिनयाने गेली अनेक दशक प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. त्यात पहिलं नाव आहे बॉलिवूड शहंशाह अमिताभ बच्चन आणि दुसरं नाव आहे साउथस्टार रजनीकांत. दोन्ही कलाकारांच्या चाहत्यांची संख्या काही कमी नाही. चाहते त्यांच्या सिनेमांची आतुरतेने वाट पाहत असतात. तब्बल 33 वर्षांनंतर रजनीकांत आणि अमिताभ बच्चन एका सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. थलायवा रजनीकांत आणि अमिताभ बच्चन त्यांच्या आगामी 'थलाईवर 170' या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. चित्रपटात दोन्ही कलाकारांची जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर येणार आहे. आता रजनीकांत यांनी अमिताभ बच्चन यांच्यासोबतचा एक फोटो सोशल मिडियावर शेअर केले आहे. या पोस्टद्वारे सुपरस्टार रजनीकांत यांनी अमिताभ यांच्यासोबत काम केल्याचा आनंद व्यक्त केला आहे. माझे हृदय आनंदाने नाचत असल्याचे त्यांनी या पोस्टमध्ये लिहिले आहे. फोटो पोस्ट करत रजनीकांत लिहितात की, '33 वर्षांनंतर मी माझे गुरु श्री अमिताभ बच्चन यांच्यासोबत टीजे ज्ञानवेल दिग्दर्शित लायकाच्या आगामी 'थलाईवर 170' या चित्रपटात पुन्हा काम करत आहे. माझे हृदय आनंदाने धडधडत आहे.' चित्रपटाच्या शूटिंगसाठी रजनीकांत मुंबईत पोहोचले आहेत. अमिताभही त्यांच्यासोबत शुट करणार आहेत.



## हमासचं समर्थन प्रसिद्ध अभिनेत्री मेसा गजाआड!

इस्त्राईल आणि हमास यांच्यातील संघर्षाला १७ दिवस झाले आहेत. मात्र या सगळ्यात इस्त्राईल काही ऐकण्यास तयार नाही. पॅलेस्टाईनमध्ये मोठी जीवित आणि वित्तहानी झाली आहे. याशिवाय गाझा पट्टीवर देखील जीवघेण्या प्रसंगांना सामोरं जावं लागत असल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. सध्या सोशल मीडियावर इस्त्राईल, हमास, गाझा पट्टी आणि पॅलेस्टाईन यावर विविध क्षेत्रातील मान्यवर प्रतिक्रिया देताना दिसत आहेत. त्या व्हायरल झाल्या आहेत. या सगळ्यात प्रसिद्ध अभिनेत्री मेसा अब्देल हादी नावाच्या अभिनेत्रीनं दिलेली प्रतिक्रिया तिच्या अंगलट आली आहे. त्यामुळे तिला मोठ्या परिणामाला सामोरं जावं लागलं आहे. इस्त्राईल पोलिसांनी अटक केली आहे. यापूर्वी हॉलीवूडमधील ५० हून अधिक कलाकारांनी अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्याकडे हे युद्ध थांबावे म्हणून लेखी निवेदन दिले आहे. अमेरिकेनं मध्यस्थी करुन हा वाद थांबवावा. असे त्या कलाकारांनी म्हटले आहे. भारताच्या काही सेलिब्रेटींनी देखील यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्यात अभिनेत्री कंगनाचे नाव घ्यावे लागेल. कंगनानं भारतातील इस्त्राईलच्या राजदूतांची भेट घेतली आहे. तिनं इस्त्राईलप्रती आपला पाठींबा दर्शवला आहे. इस्त्राईलमधील एक प्रसिद्ध अभिनेत्री मेसा अब्देल हादीला हमासचं समर्थन करणं महागात पडलं आहे. तिला पोलिसांनी अटक केली आहे. यानंतर चाहत्यांमध्ये खळबळ उडाल्याचे दिसून आले आहे.

# कांगारूंचा करेक्ट कार्यक्रम!

## » नेदरलँड्सचा पराभव करत रचला इतिहास

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**विश्वचषक २०२३च्या २४व्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नेदरलँड्सचा ३०९ धावांनी पराभव केला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत आठ गडी बाद ३९९ धावा केल्या. प्रत्युत्तरात नेदरलँडचा संघ २१ षटकांत ९० धावांत गारद झाला. कांगारू संघाने विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वात मोठा विजय संपादन केला. या विजयाने त्यांचा नेट रनरेट खूप मजबूत झाला आहे.**



ऑस्ट्रेलियन संघाने वर्ल्डकपमध्ये नेदरलँड्सचा वाईट पराभव केला. त्यांनी ३०९ धावांनी मोठा विजय मिळवला. विश्वचषकाच्या इतिहासातील हा सर्वात मोठा आणि एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासातील दुसरा सर्वात मोठा विजय आहे. ऑस्ट्रेलियाने विश्वचषकात धावांच्या बाबतीत सर्वात मोठ्या विजयाचा स्वतःचाच विक्रम मोडला. २०१५ मध्ये पर्थमध्ये अफगाणिस्तानविरुद्ध २७५ धावांनी विजय मिळवला होता. यासोबतच एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वात मोठ्या विजयाचा विक्रम भारताच्या नावावर आहे. २०२३ मध्ये तिरुअनंतपुरममध्ये श्रीलंकेविरुद्ध ३१७ धावांनी विजय मिळवला होता. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत आठ गडी बाद ३९९ धावा केल्या. प्रत्युत्तरात नेदरलँडचा संघ २१ षटकांत ९० धावांत गारद झाला. कांगारू संघाने विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वात मोठा विजय संपादन केला. ऑस्ट्रेलियन संघाने अप्रतिम गोलंदाजी करत नेदरलँडला २१ षटकांत पराभव केला. त्यासाठी फिरकीपटू ॲडम झाम्पाने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. मिचेल मार्शला दोन यश मिळाले. मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड आणि पॅट कमिन्स यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. नेदरलँडचे केवळ पाच फलंदाज दुहेरी आकडा पार करू शकले. विक्रमजीत सिंगने सर्वाधिक २५ धावा केल्या. तेजा नदामानुरूने १४, स्कॉट एडवर्ड्सने नाबाद १२, सायब्रँडने ११ आणि कॉलिन अकरमनने १० धावा केल्या. मॅक्स ओड्डाड सहा धावा करून बाद झाला, बास डी लीडेने चार आणि आर्यन दत्तने एक धाव केली. लोगान व्हॅन बीक, रोएलॉफ व्हॅन डर मर्वे आणि पॉल व्हॅन मीकरेन यांना खातेही उघडता आले नाही. तत्पूर्वी, ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत आठ गड्यांच्या मोबदल्यात ३९९ धावा केल्या होत्या. कांगारू संघासाठी डेव्हिड वॉर्नर आणि ग्लेन मॅक्सवेल यांनी विक्रमी शतके झळकावली. वॉर्नरने सहावे शतक झळकावून माजी कर्णधार रिकी पॉंटिंगचा विक्रम मोडला. विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक शतके झळकावणारा तो ऑस्ट्रेलियन खेळाडू ठरला. तर, मॅक्सवेलने शेवटच्या षटकांमध्ये झंझावाती खेळी खेळली आणि अवघ्या ४० चेंडूत आपले शतक पूर्ण केले. विश्वचषकात सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा तो खेळाडू ठरला. वॉर्नरने ९३ चेंडूत १०४ तर मॅक्सवेलने ४४ चेंडूत १०६ धावा केल्या. वॉर्नर आणि मॅक्सवेल व्यतिरिक्त स्टीव्ह स्मिथने ७१ आणि मार्नस लाबुशेनने ६२ धावा केल्या. जोश इंग्लिशने १४ आणि कर्णधार पॅट कमिन्सने नाबाद १२ धावा केल्या. मिचेल मार्श नऊ धावा करून आणि कॅमेरून ग्रीन आठ धावा करून बाद झाले. मिचेल स्टार्क खातेही उघडू शकला नाही.

### वॉर्नर मॅक्सवेल यांची शतके

» ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत आठ गड्यांच्या मोबदल्यात ३९९ धावा केल्या होत्या. कांगारू संघासाठी डेव्हिड वॉर्नर आणि ग्लेन मॅक्सवेल यांनी विक्रमी शतके झळकावली. वॉर्नरने सहावे शतक झळकावून माजी कर्णधार रिकी पॉंटिंगचा विक्रम मोडला. विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक शतके झळकावणारा तो ऑस्ट्रेलियन खेळाडू ठरला. तर, मॅक्सवेलने शेवटच्या षटकांमध्ये झंझावाती खेळी खेळली आणि अवघ्या ४० चेंडूत आपले शतक पूर्ण केले. विश्वचषकात सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा तो खेळाडू ठरला. वॉर्नरने ९३ चेंडूत १०४ तर मॅक्सवेलने ४४ चेंडूत १०६ धावा केल्या.

## यश गाठण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे!

### » पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष मनीष रानवडे यांचे प्रतिपादन

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**उच्च ध्येय, अपार कष्ट करण्याची जिद्द तसेच कितीही अपयश आले तरी खचुन न जाता प्रामाणिक प्रयत्न केले तर यश नक्कीच मिळते. प्रयत्नातील सातत्य व मेहनतीवर उज्वल यशाचे शिखर गाठता येते. खेळामुळे खेळाडूच्या अंगी चपळता, अचुकता व चांगली निर्णय क्षमता वाढते. तसेच मेहनतीला जिद्द आणि चिकाटी असेल तरच खेळाडू यशाचे शिखर गाठू शकतो. खेळाडूंनी यशाचे शिखर गाठण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे असे प्रतिपादन पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष मनीष रानवडे यांनी केले.**



दसऱ्या निमित्त आदिनाथ क्रिकेट क्लब, भोसरी वतीने मैदानाचे व साहित्याचे पूजन जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष मनीष रानवडे, मुंबई येथील न्यायाधीश संजय जगदाळे यांचा हस्ते करण्यात आले या प्रसंगी ते बोलत होते. या वेळी न्यायाधीश संजय जगदाळे, सुधीर परांजपे, भरत भिलोरे, हरिष बाबुलकर, रवी खंडाळीकर, आशुतोष सिंग, श्रेयश जगदाळे, यश खडके,बालाजी मगर व खेळाडू उपस्थित होते. न्यायाधीशपदी निवड झाल्याने क्लबचे अध्यक्ष संजय जगदाळे यांना मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. खेळाडूंनी स्पर्धेची तयारी करताना नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवला पाहिजे. ध्येय बाळगा आणि त्या ध्येयाचा पाठलाग करा. सरावात सातत्य ठेवा आपणास भविष्यात नक्कीच यश प्राप्त होईल असे खेळाडूंना मार्गदर्शन न्यायाधीश जगदाळे यांनी केले.. कार्यक्रमाची सूत्रसंचालन खेळाडू श्रीराज सूर्यवंशी यांनी तर आभार नीरज गुंजाळ यांनी मानले.

## बेन स्टोक्स दम्याशी देत आहे झुंज!

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

इंग्लंडचा स्टार अष्टपैलू बेन स्टोक्स सध्या अनेक समस्यांशी झुंजताना दिसत आहे. आधी गुडघ्याला दुखापत आणि नंतर बसण्याच्या ठिकाणी दुखापत, यामुळे तो सामन्यांपासून दूर राहिला होत. आता अलीकडेच स्टोक्स सराव करताना इनहेलर म्हणजेच दम्यासाठीचा स्प्रे पंप तो वापरताना दिसत आहे.

त्याचा हा फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. विश्वचषकात इंग्लंडचा पुढील सामना श्रीलंकेविरुद्ध होणार आहे. गुणतालिकेत इंग्लंड नवव्या स्थानावर असून २९ ऑक्टोबरला त्यांचा भारतासोबत सामना आहे. या काळात इंग्लंड विजयासाठी खूप उत्सुक आहे. दरम्यान, बंगळुरूमध्ये सराव सुरू असताना इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्स सरावानंतर इनहेलरमधून श्वास घेताना दिसत आहे. स्टोक्सने त्याचे इनहेलर वापरल्यानंतर अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. चाहत्यांच्या मनात असाही प्रश्न आहे की स्टोक्सला दमा आहे का? इंग्लंडच्या आगामी सामन्यांमध्ये स्टोक्सची खूप महत्त्वाची भूमिका असणार आहे. दुखापतीतून सावरल्यानंतर परतलेल्या स्टोक्सला गेल्या सामन्यात केवळ ५ धावा करता आल्या आणि त्याने गोलंदाजीही केली नाही. मात्र, त्याने जरी इनहेलर वापरले असले तरी बेन स्टोक्सला दमा आहे असे नाही. श्वासोच्छवासाशी संबंधित समस्यांसाठी इनहेलरचा वापर केला जातो. काही खेळाडू जड व्यायामानंतर श्वास घेण्यास त्रास होऊ नये म्हणून सामान्यतः इनहेलर वापरतात.